नमुना दोन

ग्राम : फुले पिंपळगांव

दूरध्वनी : 9657636450

ई-मेल : – फॅक्स : No = 5105

जावक क्र. : दिनांक : 31 DEC 2019

शिक्षणाधिकारी (प्राथ.)

जिल्हा परिषद,बीड

क्रमांक :

व्यवस्थापक : खाजगी दिनांक :

**विषय : बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2011 यांच्या नियम 11, पोटनियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**मा.महोदय/महोदया**

आपल्या **दि.** 15/12/**201**9 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार./ शाळेची केलेली तपासणी याआधारे.

मी शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद,बीड **दि.** 01/04/19 **पासून दि.** 31/03/22 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इ. 1 ली ते इ. 8 वी करीता ईगलवूड इंग्लिश स्कूल या शाळेस तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे.

वरील मान्यता ही खालील अटी व शर्तीत्या पूर्ततेच्या अधीन आहे.

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इ.आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2011 (जोडपत्र-2) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण दईल. परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 निर्दीष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल
5. संस्था/शाळा किणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छानणी पद्धतीसाठी बालकांस किंवा त्याच्या माता-पित्यास किंवा पालकांस भाग पडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.
7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही. किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

   (दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

   (तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

   (चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या कोणत्याही बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

   (पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्याथ्यांच्या अधिनियमांच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी कमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादीत करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दीष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकाने/शिक्षीकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये यांची सुनिश्चिती शळा करेल.

8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेलया अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेलया पाठयक्रमाचे पालन करील.
9. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खलीलप्रमाणे होत्या.

| | | | |
|---|---|---|---|
| ✓ | शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | : | |
| ✓ | एकूण बांधकाम क्षेत्र | : | 3074.72 चौ.मी. |
| ✓ | खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | : | 7193.71 चौ.मी. |
| ✓ | वर्गखोल्यांची संख्या | : | 22 |
| ✓ | कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकांची खोली | : | 03 |
| ✓ | मुलांसाठी व मुलीसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल | : | आहे. |
| ✓ | पिण्याच्या पाण्याची सुविधा | : | आहे. |
| ✓ | दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | : | आहे. |
| ✓ | अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामुग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता वाचन साहित्य विनासायास उपलब्ध | : | आहे. |

11. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरारत किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणताही नफा मिळवण्यासाठी चालविण्यात येत नाही.
15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षीत व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्र तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावी.
16. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेता 27270704707 असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा यांची नोंद घ्यावी.
17. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मगणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्री दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनांचे पालन करावे.
18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.
19. जोडपत्र-3 नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

**शिक्षणाधिकारी (प्रा.)**
**जिल्हा परिषद,बीड.**